शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग

शासकीय अध्यापक शिक्षण महाविद्यालय , बेळगांव

अध्ययन - आधारित मूल्यमापन प्रश्न पिठिका २०२५ - २६

गणित

8 वी

इयत्ता

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण विभाग
बनशंकरी तिसरा टप्पा , बेंगलूरु - ५६००८५

संकल्पनाआणिमार्गदर्शन	
श्रीमती. रश्मीमहेश. व्ही, भा.प्र.से. प्रधानसचिव, शालेयशिक्षणआणिसाक्षरताविभाग	
डॉ. त्रिलोकचंद्रके. व्ही, भा.प्र.से., आयुक्त, शालेयशिक्षणविभाग	श्री. गोपालकृष्ण.एच. एन., संचालक, डी.एस.ई.आर.टी, बेंगलुरु.
समन्वय	
श्रीमती राधा..पी., वरिष्ठ सहाय्यक संचालक, डी.एस.ई.आर.टी., बेंगलुरु	
सी.टी.ई. बेळगाव समन्वय	
श्री. श्रीकंठ .एन., सहसंचालकआणि प्राचार्य सी.टी.ई. बेळगाव	श्रीमती बी. डी. कारदगे डॉ. राघवेंद्र.पी. के. श्रीमती बी.जे.पीरजादे
संसाधनसंघ (रिसोर्सटीम)	
श्री . व्ही. एस. मुन्नोळकर	सहशिक्षक , मराठा मंडळ ताराराणी हायस्कुल , खानापूर
श्री. पी. ए. पाटील	सहशिक्षक , सरकारी माध्यमिक विद्यालय , निलावडे , तालुका - खानापूर
श्री. आर. एस. दोडमनी	सहशिक्षक , सरकारी माध्यमिक शाला , शिरोली तालुका - खानापूर
श्री. एम. एस. कदम	सहशिक्षक , श्री. रवळनाथ हायस्कूल , शिवठाण तालुका - खानापूर
श्री. पी. पी. काशीद	सहशिक्षक , मराठा मंडळ हायर सेकेंडरी स्कूल , खानापूर
पुनरावलोकनसंघ (रिव्ह्यूटीम)	
श्री. पी. पी. काशीद सहशिक्षक , मराठा मंडळ हायर सेकेंडरी स्कूल , खानापूर	

अनुक्रमणिका

परिमेय संख्या

संख्येच्या क्रियेवरुन परिमेय संख्येच्या गणधर्मांचा अभ्यास करणे

- **नैसर्गीक संख्या , पुर्ण संख्या , पुर्णांक आणि परिमेय संख्या आणि गणिती क्रिया**
- **परिमेय संख्येचे गुणधर्म :** बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार क्रियेवरील संवृत्तता ,क्रमनिरपेक्ष आणि साहचार्य गुणधर्म , शून्याची भूमिका, एक (1) ची भूमिका ,गुणाकार आणि बेरजेवरील वितरण गुणधर्म.
- **समस्या सोडवण्यासाठी दैनंदिन जीवनातील परिस्थितीत परिमेय संख्यांचा वापर करणे**

प्रश्नांचे प्रकार :

सोपे - 31	मध्यम - 13	कठीण – 04	एकून - 48

I. खालील प्रत्येक प्रश्नासाठी/अपूर्ण विधानांसाठी चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्याय निवडा आणि संपूर्ण उत्तर त्याच्या वर्णमालेसह लिहा.

1) p आणि q (q#0) हे पूर्णांक असून $\frac{p}{q}$ च्या स्वरुपात लिहिल्या जाणा-या संख्या [सोपे]

अ) नैसर्गीक संख्या ब) पूर्ण संख्या क) पूर्णांक ड) परिमेय सख्या

2) परिमेय संख्येच्या बेरजेचा अविकारक घटक कोणता [सोपे]

अ) 1 ब) 0 क) - 1 ड) $\frac{1}{2}$

3) परिमेय संख्येच्या गुणाकाराचा अविकारक घटक कोणता [सोपे]

अ) 1 ब) 0 क) - 1 ड) $\frac{1}{2}$

4) $x + 0 = 0 + x = x$ ही परिमेय संख्या असेल तर 0 हा [सोपे]

अ) परिमेय संख्येच्या बेरजेचा अविकारक ब) x चा बेरजेचा व्यस्त घटक

क) x चा गुणाकाराचा व्यस्त घटक ड) x चा परस्पर

5) $\frac{3}{5}$ बेरजेचा व्यस्त घटक [सोपे]

अ) $\frac{3}{5}$ ब) $\frac{-5}{3}$ क) $\frac{5}{3}$ ड) $\frac{-3}{5}$

6) $\frac{-7}{19}$ बेरजेचा व्यस्त घटक [सोपे]

अ) $\frac{-7}{19}$ ब) $\frac{7}{19}$ क) $\frac{19}{7}$ ड) $\frac{-19}{7}$

7) $-2\frac{7}{5}$ चा बेरजेचा व्यस्त घटक [**मध्यम**]

अ) $2\frac{7}{5}$ ब) $\frac{17}{5}$ क) - $\frac{17}{5}$ ड) $\frac{5}{17}$

8) $\frac{8}{5}$ चा गुणाकाराचा व्यस्त घटक [सोपे]

अ) $\frac{8}{5}$ ब) $\frac{5}{8}$ क) - $\frac{8}{5}$ ड) - $\frac{5}{8}$

9) $-\frac{4}{9}$ चा गुणाकाराचा व्यस्त घटक [सोपे]

अ) $\frac{4}{9}$ ब) $-\frac{9}{4}$ क) $\frac{9}{4}$ ड) 1

10) $\frac{7}{12}$ चे परस्पर सबंधीत घटक [सोपे]

अ) $\frac{7}{12}$ ब) 1 क) $\frac{12}{7}$ ड) $1\frac{5}{7}$

11) $\frac{8}{21}$ ला कोणत्या संख्येने गुणले असता गुणाकार 1 येतो [सोपे]

अ) $\frac{8}{21}$ ब) $\frac{-8}{21}$ क) $\frac{21}{8}$ ड) $\frac{-21}{8}$

12) कोणत्याही दोन परिमेय संख्येच्या मधली असणारी परिमेय संख्येची एकून संख्या [सोपे]

अ) 0 ब) 1 क) 2 ड) अनंत

13) $\frac{1}{x}$ चा गुणाकार व्यस्त घटक [सोपे]

अ) 0 ब) 1 क) x ड) 2x

14) $\frac{2}{5}$ आणि $\frac{3}{5}$ या परिमेय संख्येच्या मधली परिमेय संख्या [**मध्यम**]

अ) $\frac{4}{5}$ ब) $\frac{1}{5}$ क) $\frac{1}{2}$ ड) 1

15) कोणत्या क्रियेच्या अंतर्गत परिमेय संख्या बनत नाही [सोपे]

अ) बेरीज ब) वजाबाकी क) गुणाकार ड) भागाकार

16) वजाबाकी क्रियेवर अवलंबून असणा-या परिमेय संख्येचा गुणधर्म [सोपे]

अ) क्रमनिपेक्ष गुणधर्म ब) साहचार्य गुणधर्म

क) वितरण गुणधर्म ड) यापैकी कोणतेही नाही

17) पुर्ण संख्येसाठी सवत नसलेली गणितातील मुळ क्रिया [सोपे]

अ) बेरीज आणि गुणाकार ब) गुणाकार आणि वजाबाकी

क) वजाबाकी आणि बेरीज ड) वजाबाकी आणि भागाकार

18) पुर्णांकाच्या सवततेसाठी नसलेली गणिती मुळ क्रिया [सोपे]

अ) बेरीज ब) वजाबाकी क) भागाकार ड) गुणाकार

19) परिमेय संख्येच्या सवततेसाठी नसलेली गणिती मुळ क्रिया [सोपे]

अ) बेरीज ब) वजाबाकी क) भागाकार ड) गुणाकार

20) कोणत्याही दोन परिमेय संख्याची बेरीज [**मध्यम**]

अ) पूर्ण संख्या ब) पूर्णांक

क) परिमेय संख्या ड) नैसर्गिक संख्य

21) $\frac{2}{3}+\frac{4}{5}=\frac{4}{5}+\frac{2}{3}$ यावरुन परिमेय संख्येचा कोणता गुणधर्म दर्शवतो [सोपे]

अ) संवत्तता गुणधर्म ब) क्रमनिपेक्ष गुणधर्म

क) साहचार्य गुणधर्म ड) वितरण गुणधर्म

22) $\frac{1}{2} X \left(\frac{3}{2} X \frac{-5}{3}\right)=\left(\frac{1}{2} X \frac{3}{2}\right) X \frac{-5}{3}$ यावरुन परिमेय संख्येचा कोणता गुणधर्म दर्शवतो [सोपे]

अ) अविकारक घटक ब) क्रमनिपेक्ष गुणधर्म

क) साहचार्य गुणधर्म ड) संवत्तता गुणधर्म

23) $\frac{-5}{2} X \left(\frac{4}{3} X \frac{3}{2}\right)=\left(\frac{4}{3} X \frac{3}{2}\right) X \frac{-5}{2}$ हे उदाहरण परिमेय संख्येवरील कोणता गुणधर्म दर्शवितो

अ) क्रमनिपेक्ष गुणधर्म ब) साहचार्य गुणधर्म [सोपे]

क) संवत्तता गुणधर्म ड) अविकारक घटक

II खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (एक गुणांची प्रश्ने)

24) परिमेय संख्येच्या बेरजेचा अविकारक घटक लिहा [सोपे]

25) परिमेय संख्येच्या गुणाकाराचा अविकारक घटक लिहा [सोपे]

26) - 13 ही पुर्ण संख्या आहे का ? कारण लिहा [**मध्यम**]

27) परिमेय संख्येची व्याख्या लिहा [सोपे]

28) - 2 आणि 4 ही $\frac{p}{q}$ या स्वरुपात लिहा [सोपे]

29) $5-(-3)$ आणि $-3-5$ ची किंमत काढा [सोपे]

30) एका संख्येची ऋण संख्या म्हणजे काय ? [सोपे]

31) $\frac{-2}{3} X \frac{4}{5}$ चा गुणाकार लिहा [सोपे]

32) $2\frac{5}{4}$ चा बेरीज व्यस्त घटक लिहा [सोपे]

33) $-4\frac{3}{8}$ चा गुणाकार व्यस्त घटक लिहा [सोपे]

34) दोन परिमेय संख्येचा गुणाकार - 8 आहे . जर संख्या -10 असेल तर दुसरी संख्या काढा . [**मध्यम**

III खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (दोन गुणांची प्रश्ने)

35) खालील दिलेल्या उदाहरणावरून डावी बाजू आणि उजवी बाजू सोडवा . तसेच परिमेय संख्येच्या बेरजेचा क्रमनिरपेक्ष गुणधर्म पडताळा [मध्यम]

$$2\frac{1}{4}+\frac{3}{2}=\frac{3}{2}+2\frac{1}{4}$$

36) खालील दिलेल्या उदाहरणावरून डावी बाजू आणि उजवी बाजू सोडवा . तसेच परिमेय संख्येच्या गुणाकाराचा क्रमनिरपेक्ष गुणधर्म पडताळा [मध्यम]

$$1\frac{3}{4}X3\frac{2}{5}=3\frac{2}{5}X1\frac{3}{4}$$

37) खालील दिलेल्या उदाहरणावरून डावी बाजू आणि उजवी बाजू सोडवा . तसेच परिमेय संख्येच्या गुणाकाराचा साहचार्य गुणधर्म पडताळा [मध्यम]

$$\frac{2}{3}X\left[\frac{-3}{5}X\frac{5}{8}\right]=\left[\frac{2}{3}X\frac{-3}{5}\right]X\frac{5}{8}$$

38) खालील दिलेल्या उदाहरणावरून डावी बाजू आणि उजवी बाजू सोडवा . तसेच परिमेय संख्येचा वितरण गुणधर्म पडताळा [मध्यम]

$$\frac{6}{5}\left[\frac{5}{7}+\frac{1}{2}\right]=\frac{6}{5}X\frac{5}{7}+\frac{6}{5}X\frac{1}{2}$$

39) बेरीज आणि वजाबाकीवरुन गुणाकाराचा वितरण गुणधर्म लिहा [सोपे]

IV खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (तीन गुणांची प्रश्ने)

40) $\frac{-4}{5}X\frac{3}{7}X\frac{15}{16}X\left[\frac{-14}{9}\right]$ ची किंमत काढा [मध्यम]

41) $\frac{3}{7}+\left[\frac{-6}{11}\right]+\left[\frac{-8}{21}\right]+\left[\frac{5}{22}\right]$ ची किंमत काढा [मध्यम]

42) x X (y + z) = x X y + x X z यामध्ये $x=\frac{-1}{2}$, $y=\frac{2}{3}$ आणि $z=\frac{3}{4}$ किंमत मांडून परिमेय संख्येचा गुणधर्म पडताळा आणि गुणधर्माचे नांव लिहा [सोपे]

43) $\frac{2}{5}X\frac{-3}{7}-\frac{1}{14}-\frac{3}{7}X\frac{3}{5}$ ची किंमत काढा [सोपे]

V खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (चार गुणांची प्रश्ने)

44) खालील दिलेल्या उदाहरणासाठी बेरजेचा कोणता गुणधर्म लागू होतो ते लिहा [सोपे]

i) a + b = b + a ii) a + 0 = 0 + a = a

iii) a (b + c) = ab + ac iv) a + (b + c) = (a + b) + c

45) खालील दिलेल्या उदाहरणासाठी परिमेय संख्येच्या वितरण गुणधर्माचा उपयोग करुन किंमत काढा

$$\left\{\frac{7}{5}X\left(\frac{-3}{12}\right)\right\}+\left\{\frac{7}{5}X\frac{5}{12}\right\}$$ [मध्यम]

46) $\frac{-3}{4},\frac{2}{3}$ आणि $\frac{-5}{6}$ या परिमेय संख्येवरुन गुणाकाराच्या बेरजेचा वितरण गुणधर्म पडताळा [मध्यम

47) जर $a = \frac{2}{3}$, $b = \frac{4}{5}$ आणि $c = \frac{-5}{6}$ या परिमेय संख्या असतील तर [सोपे]

i) $a + (b + c) = (a + b) + c$ (बेरजेचा साहचार्य गुणधर्म)

ii) $a X (b X c) = (a X b) X c$ (गुणाकाराचा साहचार्य गुणधर्म) पडताळा

48) सरळरुप द्या [सोपे]

I) $\frac{32}{5} + \frac{23}{11} X \frac{22}{15}$

ii) $\frac{3}{7} + \frac{28}{15} \div \frac{14}{5}$

iii) $\frac{2}{7} X \left[\frac{7}{16} - \frac{21}{4}\right]$

iv) $\frac{3}{4} X \left[\frac{8}{9} - 40\right]$

एक चलपदीय रेषीय समीकरणे

एक चलपदीय रेषीय समीकरणे आणि दैनंदिन जीवनातील समस्या समीकरणाच्या

- बैजीक पदे : समीकरणाची चलपदे , चलपदाचा मोठ्यात मोठा घातांक , रेषीय समीकरणे , एक चलपदीय रेषीय समीकरणे आणि समीकरणे सोडविण्याच्या पाय-या.
- एक चलपद असणा-या समीकरणामध्ये एका कडे बीजपदे आणि दुस-याकडे संख्या असताना समीकरणे सोडविने.
- समीकरणाचे परिमाण किंवा समीकरणाची मांडनी करून सोडविने
- समीकरणाच्या दोन्ही बाजूला बीजपदे असताना समीकरणे सोडविने
- समीकरणांना रेषीय समीकरणाच्या स्वरुपात मांडून समीकरणे सोडविने .

प्रश्नांचे प्रकार :

सोपे - 26	मध्यम - 13	कठीण – 03	एकून - 42

I. खालील प्रत्येक प्रश्नासाठी/अपूर्ण विधानांसाठी चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्याय निवडा आणि संपूर्ण उत्तर त्याच्या वर्णमालेसह लिहा.

1) खालील दिलेल्या बैजीक राशीपैकी कोणती राशी रेषीय समीकरण दर्शविते [सोपे]

अ) $y + 1$ ब) $p(p + 2)$ क) $x^3 + x^2 – 1$ ड) $t^2 – 1$

2) खालील समीकरणापैकी कोणते समीकरण रेषीय समीकरण दर्शविते [सोपे]

अ) $x – 1 = 0$ ब) $m + 7 = 0$ क) $4x =$ ड) $2x + 5 = 1$

3) $3m + 4 = 10$ या समीकरणाचे चलपद [सोपे]

अ) 3 ब) 4 क) m ड) 10

4) खालील समीकरणापैकी कोणते समीकरण रेषीय समीकरण दर्शविते [सोपे]

अ) $4x + 3y=12$ ब) $2x+5y=0$ क) $y-3=3(x-4)$ ड) $3y+ 4=0$

5) $1 + z + z^2 + z^3$ या समीकरणामध्ये z या चलपदाचा मोठ्यातमोठा घातांक [सोपे]

अ) 0 ब) 1 क) 2 ड) 3

6) एका रेषीय समीकरणामध्ये चलपदाचा मोठ्यातमोठा घातांक किती असतो [सोपे]

अ) 0 ब) 1 क) 2 ड) 3

7) खालील चिन्हापैकी समानतेच चिन्ह कोणते [सोपे]

अ) x ब) ÷ क) ≠ ड) =

8) $5x – 6 = \frac{4}{5}$ या समीकरणाचे चलपद लिहा [सोपे]

अ) x ब) - 6 क) $\frac{4}{5}$ ड) 5x

9) $2x - 3 = 7$ या रेषीय समीकरणातील x ची किंमत [सोपे]

अ) 10 ब) 5 क) - 2 ड) 2

10) $\frac{5}{3} - 4p = 1$ या रेषीय समीकरणातील p ची किंमत [**मध्यम**]

अ) $\frac{1}{6}$ ब) 6 क) $-\frac{1}{6}$ ड) - 6

11) $8x = 15 + 3x$ या रेषीय समीकरणातील x ची किंमत [सोपे]

अ) - 3 ब) 3 क) 5 ड) - 5

12) $3n - 5 = 6 + 2n$ या रेषीय समीकरणातील n ची किंमत [सोपे]

अ) 1 ब) 11 क) - 11 ड) - 1

13) $2y - 1 = 17 - y$ या रेषीय समीकरणातील y ची किंमत [सोपे]

अ) 6 ब) - 6 क) 8 ड) $\frac{16}{3}$

14) एका मुलाकडे २ ची काही नाणी आहेत. जर त्या नाण्याची एकून रक्कम २० असेल तर ती एकून नाणी शोधण्यासाठी मांडण्यात येणा-या समीकरणाची रचना [सोपे]

अ) $x + 2 = 20$ ब) $2x = 20$ क) $x + 20 = 2$ ड) $20x = 2$

15) दोन क्रमवार धन संख्यांची बेरीज असणा-या समीकरणाची रचना [सोपे]

अ) $x + (x + 1) = 73$ ब) $2x = 73$ क) $x (x + 1) = 73$ ड) $x + (x + 2) = 73$

16) जर एका आयताची परिमीती 22 m. आणि लांबी 6 m. असेल तर त्या आयताची रुंदी काढा **मध्यम**

अ) 6 m. ब) 5 m. क) 10 m. ड) 12 m.

II खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (एक गुणांची प्रश्ने)

17) रेषीय समीकरणाची व्याख्या लिहा [सोपे]

18) समीकरण म्हणजे काय [सोपे]

19) बैजीक समीकरणाची व्याख्या लिहा [सोपे]

20) $2x - 3 = x + 2$ या समीकरणाच्या डाव्या बाजूची पदावली लिहा [सोपे]

21) $3x = 2x + 18$ या समीकरणाच्या उजव्या बाजूची पदावली लिहा [सोपे]

22) $10x + 7 = 3x - 28$ या समीकरणामधील ला डाव्या बाजूला पक्षांतर करा [सोपे]

23) $7x = - 35$ या रेषीय समीकरणातील x ची किंमत काढा [सोपे]

24) $y + y^2$ हे रेषीय समीकरण नाही , कारण लिहा [**मध्यम**]

25) एका समीकरणाच्या डाव्या आणि उजव्या बाजूला असणारी बैजीक राशीच्या समान असणा-या किंमतीला काय म्हणतात [सोपे]

III खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (दोन गुणांची प्रश्ने)

26) सोडवा $5x = 3x + 6$ [सोपे]

27) सोडवा $x + 7 = 8x$ [सोपे]

28) सोडवा $6m - 5 = 4m + 11$ [सोपे]

29) सोडवा $4(2p - 1) = 3p + 6$ [सोपे]

30) सोडवा $\frac{15}{4}$ - 7x = 9 [**मध्यम**]

31) सोडवा 3n – 5n = $\frac{8}{3}$ [**मध्यम**]

IV खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (तीन गुणांची प्रश्ने)

32) सोडवा $\frac{2}{5}y + \frac{1}{2} = y - 3\frac{1}{2}$ [**कठीण**]

33) सोडवा $\frac{2}{3}n - \frac{3}{2} = \frac{4}{3}n + \frac{5}{2}$ [**कठीण**]

34) सोडवा $\frac{3t-2}{4} - \frac{2t+3}{3} = \frac{2}{3} - t$ [**कठीण**]

35) एका आयताकार शेताची परिमीती 154 m. आहे . जर शेताची लांबी त्याच्या रुंदीच्या 2m. ने अधिक असेल तर त्या शेताची लांबी आणि रुंदी काढा . [**मध्यम**]

36) दोन सख्येची बेरीज 95 आहे. जर एक संख्या दुस-या संख्येच्या 15 ने अधिक असेल तर त्या संख्या काढा. [**मध्यम**]

37) दोन क्रमवार संख्याची बेरीज 51 आहे . हे विधान रेषीय समीकरणाच्या स्वरुपात लिहून त्या संख्या काढा. [**मध्यम**]

V खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (चार गुणांची प्रश्ने)

38) खालील समीकरणे सोडवा [**मध्यम**]

i) $\frac{6x+1}{3}+1=\frac{x-3}{6}$ ii) $m-\frac{m-1}{2}=1-\frac{m-2}{3}$

39) खालील रेषीय समीकरणाना सरळरुप द्या. [**मध्यम**]

i) 15 (y – 4) – 2 (y – 9) + 5 (y + 6)

ii) 3 (5z – 7) – 2 (9z – 11) = 4 (8z – 13) – 17 [**कठीण**]

40) जर त्रिकोणाचे तिन्ही कोन 1 : 2 : 3 प्रमाणात आहेत. तर त्या त्रिकोणाच्या तीन्ही कोनांच्या किंमती काढा. [**मध्यम**]

41) समद्विभूज त्रिकोणाच्या आकाराचा एक पत्रा आहे आणि त्या पत्र्याची परिमीती 36 cm.. आहे. जर असमान बाजू 10 cm. असेल तर राहिलेल्या दोन समान बाजूंची लांबी काढा. [**मध्यम**]

42) एका मुलाचे वय त्याच्या वडीलाच्या वयाच्या 1/3 एतके आहे. जर वडीलांचे वय 48 वर्षे असेल तर मुलाचे आताचे वय काढा. तसेच त्या मुलाची बहिन त्याच्या दोन वर्षानी लहान असेल तर त्या मुलाच्या बहिनीचे वय काढा . [**मध्यम**]

चौकोनाचा परिचय

चौकोनांच्या कोनाच्या गुणधर्म , त्याच्यांशी सबंधीत उदारहरणे सोडविणे

- बहुभुजाकृती : व्याख्या , बहुभूजांचे प्रकार , बहुभूजांचे अंतर कोन आणि बाह्यकोन
- अंतर्वक्र आणि बाह्यवक्र बहुभूजाकृती
- नियमित आणि अनियमित बहुभूजाकृती
- एका बहुभूजाकृतीच्या सर्व बाह्यकोनांची बेरीज
- चौकोनांचे प्रकार : समलंब , पतंग , समांतरभूज चौकोन
- एका समांतरभूज चौकोनाचे शिरोबिंदु , कोन आणि कर्ण
- काही विशेष समांतरभूज चौकोन : समभूज , आयत , चौरस

प्रश्नांचे प्रकार :


सोपे - 22	मध्यम - 25	कठीण – 09	एकून - 56

I. खालील प्रत्येक प्रश्नासाठी/अपूर्ण विधानांसाठी चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्याय निवडा आणि संपूर्ण उत्तर त्याच्या वर्णमालेसह लिहा.

1) रेषाखंडानी सांधून तयार होणा-या सरळ वक्राकृतीला [सोपे]

अ) बहुभूजाकृती ब) चौरस क) आयत ड) त्रिकोण

2) खालीलपैकी कोणती आकृती बहुभूजाकृती दर्शविते [सोपे]


अ) 


ब) 


क) 

ड) 



3) खालीलपैकी कोणती आकृती बहुभूजाकृती दर्शवित नाही [सोपे]



अ) 

ब) 

क)  ड) 

4) खालीलपैकी कोणती आकृती नियमित बहुभूजाकृती दर्शविते [सोपे]

अ)  ब) 

क)  ड) 

5) एका बहुभूजाकृतीसाठी आवश्यक असणा-या कमीतकमी बाजूंची संख्या [सोपे]

अ) तीन ब) चार क) पाच ड) अनंत

6) त्रिकोणी बहुभूज़ाकृतीच्या बाजूंची संख्या [सोपे]

अ) 1 ब) 2 क) 3 ड) 4

7) सात बाजू असणारी बहुभूजाकृती [सोपे]

अ) षष्ठभूज़ाकृती ब) अष्ठभूजाकृती क) सप्तभूज़ाकृती ड) नवभूज़ाकृती

8) एका समांतरभूज चौकोनाचा प्रत्येक कोन 90^0 असेल तर त्या आकृतीला [सोपे]

अ) चौरस आणि आयत ब) आयत क) समांतरभूज चौकोन ड) चौरस

9) कोणत्याही एका बहुभूजाकृतीच्या सर्व बाह्यकोनांची बेरीज [सोपे]

अ) 180^0 ब) 360^0 क) 240^0 ड) 90^0

10) एका काटकोन त्रिकोणाचा एक कोन 30^0 चा असेल तर तिसरा कोन [सोपे]

अ) 90^0 ब) 30^0 क) 180^0 ड) 60^0

11) एका समांतरभूज चौकोनाच्या सलग्न कोनांची बेरीज [सोपे]

अ) 70^0 ब) 110^0 क) 180^0 ड) 360^0

12) चार बाजूनी अंतरीत असणा-या बहिर्वक्र बहुभूजाकृतीच्या कोनांची बेरीज [सोपे]

अ) 180^0 ब) 90^0 क) 240^0 ड) 360^0

13) खालीलपैकी कोणती नियमित बहुभूज़ाकृती आहे [सोपे]

अ) आयत ब) चौरस क) पतंग ड) समभूज चौकोन

14) खालीलपैकी कोणती बहुभूज़ाकृती समान कोन आणि समान बाजू असणारी बहुभूज़ाकृती आहे [सोपे

अ) नियमित बहुभूज़ाकृती ब) विषमभूज त्रिकोण क) आयत ड) समभूज चौकोन

15) एका त्रिकोणाच्या तिन्ही आंतरकोनांची बेरीज [सोपे]

अ) 360^0 ब) 210^0 क) 180^0 ड) 240^0

16) नियमत चौकोनाच्या प्रत्येक कोनांची किंमत [सोपे]

अ) 90^0 ब) 180^0 क) 240^0 ड) 360^0

17) एका समांतरभूज चौकोनाचे कर्ण परस्परांना छेदत असतील तर ती बहुभूज़ाकृती [सोपे]

अ) समलंब चौकोन ब) आयत क) समभूज चौकोन ड) पतंग

18) एका चौकोनाचे कोन 40^0 , 120^0 , 10^0 आणि x असेल तर x ची किंमत काढा [साधारण]

अ) 40^0 ब) 120^0 क) 190^0 ड) 180^0

19) n बाजू असणा-या बहुभूजाकृतीच्या आंतरकोनांची बेरीज काढण्याचे सुत्र [सोपे]

अ) $(n-2) \times 180^0$ ब) $(n-2) \times 360^0$ क) $(n-1) \times 180^0$ ड) $(n-1) \times 360^0$

20) एका चौरसाचे दोन कर्ण परस्परांना छेदत असून छेदन बिंदू मधील अंतरीत केलेला कोन [सोपे]

अ) 45^0 ब) 180^0 क) 90^0 ड) 120^0

21) एका त्रिकोणामध्ये अंतरीत असलेल्या कर्णाची संख्या [सोपे]

अ) 0 ब) 1 क) 2 ड) 3

II खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (एक गुणांची प्रश्ने)

22) बहुभूजाकृतीची व्याख्या लिहा [सोपे]

23) चौकोनाची व्याख्या लिहा [सोपे]

24) नियमित बहुभूजाकृती म्हणजे काय ? [सोपे]

25) एका षष्ठभूजाकृतीचे पाच कोन 150^0,95^0, 80^0,135^0 आणि 125^0 असेल तर सहावा कोन काढा कठीण

26) एका षष्ठभूजाकृतीच्या कर्णाची संख्या लिहा [सोपे]

27) 24^0 बाह्यकोन असणा-या नियमित बहुभूजाकृतीमध्ये असणा-या बाजूंची संख्या लिहा [साधारण]

28) 165^0 बाह्यकोन असणा-या नियमित बहुभूजाकृतीमध्ये असणा-या बाजूंची संख्या लिहा [साधारण]

29) एका नियमित पंचभूजाकृतीच्या प्रत्येक आंतरकोनांची किंमत काढा [साधारण]

30) एक नियमित बहुभूजाकृती होण्यासाठी कमीतकमी किती अंतरकोन असला पाहिजे ? [कठीण]

31) एक नियमित बहुभूजाकृती होण्यासाठी कमीतकमी किती बाह्यकोन असला पाहिजे ? [कठीण]

32) समांतरभूज चौकोनाचा एक कोन 60^0 असून त्याचा सम्मुख कोन आणि सलग्न कोन काढा [साधारण

III खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (दोन गुणांची प्रश्ने)

33) आंतरवक्र आणि बाह्यवक्र बहुभूजाकृतीमधील फरक लिहा [साधारण]


34) नियमित आणि अनियमित बहुभूजाकृतीमधील फरक लिहा [साधारण]

35) पतंगचे कोणतेही दोन गुणधर्म लिहा [सोपे]

36) आयताचे कोणतेही दोन गुणधर्म लिहा [सोपे]


37) चौरसाचे कोणतेही दोन गुणधर्म लिहा [सोपे]

38) दिलेल्या आकृतीत समांतरभूज चौकोनच्या कर्णाची नांवे लिहा [सोपे]



39) खालील आकृतीचे निरीक्षण करा आणि खालील दिलेले भाग दर्शवा (कोणतेही दोन) [साधारण]

i) सम्मुख बाजू ii) सम्मुख कोन iii) संगत बाजू iv) संगत कोन



40) जर एका नियमित बहुभूजाकृतीचा प्रत्येक बाह्यकोन 60^0 असेल तर त्या बहुभूजाकृतीच्या बाजूंची संख्या काढा [साधारण]


41) एका समांतरभूज चौकोनाचा एक कोन 70^0 असेल तर बाकीचे कोन काढा [साधारण]

42) एका समांतरभूज चौकोनाच्या संगत कोनांचे गुणोत्तर 3 : 2 असेल तर प्रत्येक कोनाची किंमत काढा [साधारण]


IV खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (तीन गुणांची प्रश्ने)

43) नियमित बहुभूजाकृती म्हणजे काय ? खालील दिलेल्या बाजूवरून बहुभूजाकृतीचे प्रकार ओळखा
i) 3 बाजू ii) 4 बाजू iii) 6 बाजू [साधारण]


44) खालील दिलेल्या आकृतीवरून x ची किंमत काढा [साधारण]



45) खालील दिलेल्या आकृतीमध्ये HOPE एक समांतरभूज चौकोन आहे तर x , y आणि z कोनाच्या किंमती काढा आणि त्याचे कारण लिहा [कठीण]



46) खालील दिलेल्या आकृतीमध्ये ABCD हा समांतरभूज चौकोन आहे तर x आणि y कोनाच्या किंमती काढा



[साधारण]

47) जर ABCD या चौकोनाचे कोन A , B , C आणि D अनुक्रमे 1 : 2 : 3 : 4 या प्रमाणात असेल तर चौकोनाच्या प्रत्येक कोनाची किंमत काढा [साधारण]

48) जर एका चौकोनाचे कोन 3 : 4 : 5 : 6 या प्रमाणात असेल तर चौकोनाच्या चारही कोनाच्या किंमती काढा [साधारण]

49) एका नियमित बहुभूजाकृतीचा बाह्यकोन आणि आंतरकोन 2 : 7 या प्रमाणात असेल तर त्या बहुभूजाकृतीच्या बाजूंची संख्या काढा [साधारण]

50) एका नियमित बहुभूजाकृतीचा प्रत्येक बाह्यकोन 45^0 चा असेल तर त्या बहुभूजाकृतीच्या बाजूंची संख्या काढा [साधारण]

51) 15 बाजू असणा-या नियमित बहुभूजाकृतीचे आंतरकोन काढा [साधारण]

V खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (चार गुणांची प्रश्ने)


52) सिध्द करा " समभूज चौकोनाचे कर्ण परस्परांना दुभागतात "

53) जर समांतरभूज चौकोनाचे संगत कोन $(3x - 4)^0$ आणि $(3x + 10)^0$ असतील तर त्या समांतरभूज चौकोनाचे कोन काढा [कठीण]

54) जर एका चौकोनाचे तीन्ही कोन 4 : 6 : 3 या प्रमाणात आहेत आणि चौथा कोन 100^0 असेल तर चौकोनाचे तीन्ही कोन काढा [कठीण]

55) आयताच्या एका कर्णाची लांबी 5 cm. आणि एका बाजूची लांबी 3 cm. असेल तर आयताची परिमीती काढा [कठीण]

56) दिलेल्या आकृतीवरून ABCD हा समांतरभूज चौकोन आहे . तर x , y , z आणि ° ची किंमत काढा [कठीण]



माहिती हाताळणे

शिकण्याचे परिणाम

- **स्तंभालेख आणि त्रिज्यांतर खंडालेख आणि त्यांचा**
- यादृच्छिक प्रयोगाचा अर्थ समजून घ्या आणि अशा प्रयोगामध्ये आपल्याला पाहिजे असलेले घटनेची संभाव्यता शोधा

सारांश

- माहिती मिळवू
- विविध प्रकारचे आलेख

    a) चित्रालेख

    b) स्तंभालेख

    c) दुहेरी स्तंभालेख

- त्रिजांतरखंडालेख
- त्रिशांतर खंडालेखाचे रचना
- संधी आणि संभाव्यता

    a) काही निष्पत्ती मिळवणे

    b) सम संभाव्य निष्पत्ती

    c) संधी संभावतेला जोडणे

    d) घटना स्वरूपातील निष्पत्ती

    e) संधी आणि संभाव्यता यांचा वास्तव जीवनाशी संबंध

सुलभ – 33	साधारण - 10	कठीण - 06	एकूण - 49



I. खालील प्रश्नांना किंवा अपूर्ण विधानांना चार पर्यायी उत्तरे दिली आहेत त्यापैकी योग्य उत्तर निवडा आणि उत्तरेक्रमानुसार लिहा


1. मूलभूत माहिती संग्रह (साधारण)

A. काही अप्रकाशित माहिती B. माहिती संग्रहाकडून C. वर्तमानपत्रकानुसार D. काहीमित्राकडून

2. यापैकी मोजमाप पट्टीचा वापर यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे (साधारण)

A) स्तंभालेख B) चित्रालेख C) दुहेरी स्तंभालेख D) यापैकी सर्व

3. चित्रालेखांमध्ये जर हे चित्र 50 विध्यार्थी दर्शवितात असेल तर 

 दर्शविलेल्या विध्यर्थ्यांची संख्या किती आहे ? (साधारण)

A) 100 विध्यार्थी B) 110 विध्यार्थी C) 120 विध्यार्थी D) 150 विध्यार्थी

4. चिन्हांचा प्रतीक किंवा चित्राचा वापर करून माहिती सादर करणारा आलेख mmm

A) स्तंभालेख तक्ता B) चित्रालेख C) त्रिज्यांतर खंडालेख D)दुहेरी स्तंभालेख

5. माहिती सादर करणारा आलेख समान रुंदीच्या परंतु माहितीशी संबंधित उंची असलेल्या स्तंभाद्वारे

A) स्तंभालेख B) चित्रालेख C) त्रिज्यांतर खंडालेख D)दुहेरी स्तंभालेख

6. दोन माहिती एकत्र दाखवणारा आलेख म्हणजे (सुलभ)

A) स्तंभालेख B)चित्रालेख C) प्रियांतर खंडालेख D) दुहेरी स्तंभालेख

7. माहिती तुलना करण्यासाठी वापरलेला आलेख (सुलभ)

A) स्तंभालेख B) चित्रालेख C) त्रिज्यांतर खंडालेख D) दुहेरी स्तंभालेख

8. पूर्ण वर्तुळ आणि त्यांच्या भागामध्ये संबंध दर्शविणारा आलेख (सुलभ)

A) स्तंभालेख B) चित्रलेख C) त्रिज्यांतर खंडालेख D) दुहेरी स्तंभालेख


9.वर्तुळाच्या केंद्रातील एकूण कोनाचे माप लिहा (सुलभ)






(A) 90 (B) 180 (C) 270 (D) 360

10. प्रत्येक वर्तुळखंडाचा मध्यवर्ती कोन ल मापनाचाखालीएक अंश आहे (सुलभ)

(A) 90 (B) 180 (C) 270 (D) 360

11. दिलेल्या चित्रात नकाशात 8 वी च्या विध्यर्थ्यांना कोणत्या ठिकाणाला भेट ध्यायवाची आहे याची माहिती



दिली आहे तर विध्यार्थी = (सुलभ)

अनुक्रमणिका	विशिष्ट स्थान	विद्यार्थ्यांची संख्या
1	काश्मीर	
2	मनाली	
3	शिमला	
4	आग्रा	
5	कोडगू	

आग्रहाला भेट देऊन आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या किती

A) 2 B) 3 C) 7 D) 4

12.खाली दिलेल्या तक्त्यात विद्यार्थ्यांना शाळेला जाण्यासाठी वापरण्यात येणारी वाहतूक व्यवस्था दाखवली आहे

अ. क्र	वाहतूक व्यवस्था	विद्यार्थ्यांची संख्या  = 2मुले = 2मुली
1		
2		
3		
4		

मुलांच्या पेक्षा सायकलने शाळेला जाणारे मुलींची संख्या किती

A) 1 B) 2 C) 3 D)4


13.खाली दिलेल्या त्रिज्यांतर खंडाले मध्ये विद्यार्थी शाळेला जाण्यासाठी वापरण्यात आलेले वाहतुकीच्या साधनाचा सर्वेक्षण केले आहे यामध्ये विद्यार्थी सर्वाधिक वापरलेल्या वाहतूक साधन कोणते?(सुलभ (

A)कार

B) रेल्वे

C)बस

D) पायी



14. एक नाणे वर एकदा फेकल्यावर एकूण येण्याची संभाव्यता संख्या किती (सुलभ)

A) 1 B) 2 C)3 D) 0

15. जेव्हा एक फासा फेकल्यावर एकूण येण्याची संभाव्यता संख्या किती (सुलभ)

A) 1 B)2 C) 3 D) 6

16. जेव्हा एक फासा फेकल्यावर समसंख्या येण्याची संभाव्यता किती (सुलभ)

A) ½ B) 1/6 C)1/3 D) टक्केवारी

17. खालीलपैकी कोणते संभाव्यता घडण्याची शक्यता कमी आहे (सुलभ)

A) 3 B) 2/3 C)15% D)0.7


18. खालील फिरत्या चाकामध्ये विषम संख्येवर येण्याची संभाव्यता कोणते (सुलभ)

A)4/8

B)4/4

C)1/4

D)1/3



II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (एक गुणाचे प्रश्न)

19.चित्रा लेख कशाला म्हणतात? (सुलभ)

20. स्तंभालेख कशाला म्हणतात?

21. दुहेरी स्तंभालेख कशाला म्हणतात? (सुलभ)

22.त्रिज्यांतर खंडाले कशाला म्हणतात? (सुलभ)

23.स्तंभालेख आलेखावरून आपल्याला काय दर्शवते? (साधारण)

24. माहितीची तुलना करण्यासाठी वापरला जाणारा आलेख कोणता असेल (सुलभ)

25. त्रिज्यांतर खंडालेख प्रत्येक भाग काय दर्शवते? (सुलभ)

26. संधी मिळणे म्हणजे काय?

27. एकदा एक नाणे वर फेकल्यावर मिळणारे संभाव्यता किती ते लिहा (सुलभ)


28. एकदा एक फासा फेकल्यावर येणारे संभाव्यता किती? (सुलभ)

29. घटनेची संभाव्यता याचे एक उदाहरण द्या (सुलभ)


30. घटना म्हणजे काय? (सुलभ)

31. स्कूटर चालू करताना या प्रयत्नात साध्य होणारे परिणाम काय असेल? (सुलभ)

32. खाली दिलेली चाकाची आकृती फिरवल्यावर कोणते परिणाम शक्य आहेत ते लिहा(सुलभ)






33. एका पिशवीत वेगवेगळ्या रंगाचे पाच एकसारखे चेंडू आहेत जर पिशवीतून यादृच्छिकपणे चेंडू काढला तर त्याचे संभाव्यवताचे परिणाम लिहा (सुलभ)



III खालील प्रश्नांची उत्तरे लिहा(दोन गुणाचे प्रश्न)


34. स्तंभालेखाचे दोन गुणधर्म लिहा (सुलभ)

35. आठवड्याच्या पहिला सहा दिवसात विकल्या गेलेल्या पंख्यांची माहिती खालील प्रमाणे आहे तर पंखा बरोबर दोन प्रमाणे ( = 2 पंखा) (साधारण)

सोमवार	
मंगळवार	
बुधवार	
गुरुवार	
शुक्रवार	
शनिवार	

आठवड्यातील कोणत्या दिवशी पंख्यांची विक्री जास्त झाली आणि किती संख्या?

36. खाली दिलेले आकृतीचे निरीक्षण करा आणि दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कठीण)

अ. नं	महिना	 =100  = 50
1	जुलै	
2	ऑगस्ट	
3	सप्टेंबर	

1. जुलै महिन्यात तयार झालेले कार किती?

2. कोणत्या महिन्यात सर्वात जास्त कार तयार झालेत?

37. खालील दिलेल्या माहितीनुसार प्रमाण वापरून स्तंभालेख काढा (साधारण)

अक्र	आवडतेजेवण	लोकांचीसंख्या
1	उत्तरभारत	30
2	दक्षिणभारत	40
3	चीन	25
4	इतर	25

38. संख्या खालील प्रमाणे आहेत ते तर त्रिज्यांतर एका वस्तीगृहात वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या विद्यार्थ्यांची खंडालेखामध्ये काढून दाखवा (कठीण)


भाषा	हिंदी	इंग्रजी	मराठी	तामिळ	बंगाली	एकूण
विध्यार्थ्यांचीसंख्या	40	12	09	07	04	72

39.एक फासा फेकल्यावर अविभाज्य संख्या येण्याचे संभाव्यता किती? (सुलभ)

40.एका पिशवीत 4लाल चेंडू आणि 2 पिवळे चेंडू आहेत त्यापैकी पिशवीतून याद्दच्छिकपणे लाल चेंडू काढल्यास मिळण्याची शक्यता किती आहे आणि ते पिवळा चेंडू मिळण्यापेक्षा जास्त असेल की कमी असेल

41. उद्या पाऊस पडण्याची शक्यता 0.85 आहे म्हणून उद्या पाऊस पडणार नाही याची शक्यता शोधा (साधारण)

42.एका चाकाची आकृतीमध्ये 3 हिरवे 1 निळा आणि 1 लाल असे भाग आहेत जर चाक फिरवल्यावर फिरकीपटू हिरव्या भागावर थांबण्याची शक्यता किती असेल आणि निळ्या भागावर थांबण्याची शक्यता किती असेल (कठीण)



IV. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (तीन गुणाचे प्रश्न)


43. खालीदिलेलेचाक चक्र फिरवले असत (कठीण)

i. हिरव्या खंडावर काटा उभा राहतो की नाही त्याचे निकाल काय असेल

ii. हिरव्या खंडामध्ये संभाव्यता किती असेल

iii. हिरव्या खंडामध्ये न येण्याची संभाव्यता किती असेल

44. खालील दिलेल्या त्रिज्यांतर खंडालेखामध्ये एका कुटुंबाचा मासिक वस्तूचे खर्चाचे विवरण तसेच त्यांचे बचत टक्केवारीनुसार दिलेले आहे (कठीण)



i कोणत्या वस्तूवर सर्वात जास्त खर्च झाला आहे

ii कुटुंबाचा एकूण बचत किती आहे तसेच बचती एवढाच खर्च आणखी कोणता आहे

iii जर कुटुंबाचा मासिक पगार रुपये असेल तर कापडावर किती खर्च झाला 3000

45. . खालील तक्त्यानुसार योग्य आलेख काढा (साधारण)

अनं	मुलांनीशाळेलायेण्याचीइच्छानिर्माणकरणे	शाळाA	शाळाB	शाळाC
1	चालणे	40	55	15
2	सायकल	45	25	35

V. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा चार गुणाचे प्रश्न

46. खालील दिलेल्या तक्त्यानुसार आठ संघाच्या एक दिवसीय सामन्या मधील जिंकलेले माहिती दिली आहे तर हे दुहेरी स्तंभालेखाद्वारे दाखवा (कठीण)

अनं	संघ	चॉम्पियान्सट्रॉफीते2006 च्याविश्वचषकापर्यंत	2007 मध्येखेळलेलेशेवटचे10 एकदिवशीयसामने
1	दक्षिणआफ्रिका	75.%	78%
2	ऑस्ट्रेलिया	61%	40%
3	श्रीलंका	54%	38%
4	न्यूजहीलॅंड	47%	50%
5	इंग्लंड	46%	50%
6	पाकिस्तान	45%	44%
7	वेस्टइंडिज	44%	30%
8	भारत	43%	36%

47. 1ते6. आकड्याचा फासा फेकल्यावर मिळणारे संभाव्यता खालील घटनानुसार परिणाम लिहा (साधारण)



1. नैसर्गिक संख्या 2. अविभाज्य संख्या

3.पाच पेक्षा मोठी संख्या 4. पाच पेक्षा जास्त नसलेले संख्या

48. 1 ते 10 हे अंक वेगवेगळ्या कार्डावर एका कार्डावर एक नंबर लिहिलेले असेल आणि हे एका बॉक्समध्ये ठेवले आहेत आणि त्या बॉक्समधील सर्व कार्ड चांगले मिसळल्यानंतर यादच्छिकपणे काढले जाते तेव्हा त्या कार्डची संभाव्यता शोधा (साधारण)

1. कार्ड क्रमांक 6 मिळवणे 2. 68.026

3. 6 पेक्षा मोठी संख्या मिळवणे 4. एक अंकी संख्या मिळवणे

VI. खालीलप्रश्नांचीउत्तरेलिहा (चार गुणाचे प्रश्न)

49. खालील तक्त्यात पाच गावातील बैलगाड्यांची संख्या दाखवली आहे त्याचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कठीण)

अ. क्र.	गाव	बैलगाडीचीसंख्या
1	A	7 बैलगाडी
2	B	8 बैलगाडी
3	C	5 बैलगाडी
4	D	4बैलगाडी
5	E	6,बैलगाडी

A.सर्वातजास्तबैलगाडीअसलेलेगावकोणते

B. सर्वातकमीबैलगाडीअसलेल्यागावकोणते

C. B गावातीलबैलगाडी C गावांपेक्षाकितीबैलगाडीजास्तआहेत

D. एकूण 5 गावातीलबैलगाड्यांचीसंख्याकिती

वर्ग आणि वर्गमूळ

दिलेल्या संख्यांची वर्गणी वर्गमूळ विविध पद्धतीने शोधली जातील

सारांश

- ❖ वर्गसंख्येचे गुणधर्म
- ❖ काही मनोरंजक नमुने
- ❖ संख्येचे वर्ग शोधणे
- ❖ पायथागोरसचे त्रिकेच नियम
- ❖ वर्गमूळ काढणे वारंवार वजाबाकी करून वर्गमूळ काढणे
- ❖ मूळ अवयवाने वर्गमूळ काढणे
- ❖ भागाकार पद्धतीने वर्गमूळ काढणे
- ❖ दशांश अपूर्णांकांचे वर्गमूळ

सुलभ	साधारण	कठीण	एकूण
17	43	11	71

I.खालील प्रश्नांना किंवा विधानांना चारपर्यायी उत्तरे दिली आहेत त्यापैकी योग्य उत्तर निवडा आणि पूर्ण उत्तर त्याच्या अक्षरासह लिहा

1) . पहिल्या n नैसर्गिक विषम संख्यांची बेरीज किती. (सुलभ)

(A) n (B) n+1 (C) n^2 (D) 2n

2) 13 चा वर्ग किती. (सुलभ)

(A) 26 (B) 169 (C) 196 (D) 1313

3.) खालील पैकी पूर्ण वर्ग संख्या शोधा (सुलभ)

(A) 10 (B) 15 (C) 25 (D) 30

4.) (-7) चा वर्ग काढा. (सुलभ)

(A) 14 (B) – 14 (C) 49 (D) -49

5.) $\sqrt{x} = 8$ असताना x ची किंमत काढा (साधारण)

(A) 14 (B) – 14 (C) 49 (D) -49

6.) 30 आणि 40 मधील पूर्णवर्ग संख्या कोणती ते शोधा (साधारण)

(A) 2 (B) 4 (C) 8 (D) 64

7.) पहिल्या 8 विषम नैसर्गिक यांची बेरीज (साधारण)

(A) 32 (B) 35 (C) 36 (D) 39

8.) 0.09 चा वर्गमूळ किती (साधारण)

(A) 0.3 (B) 0.03 (C) 0.81 (D) 0.0081

9.) वारंवार वजाबाकी पद्धतीने शून्यावर पोहोचण्यासाठी 11 वी पायरी घेतली असता दिलेली वर्गसंख्या शोधा. (साधारण)

(A) 100 (B) 121 (C) 144 (D) 169

10). एक पूर्णवर्ग संख्या 9 ला संपते तेव्हा तिच्यावर वर्गमूळच्या सुटेस्थानात असणारी संख्या (साधारण)

(A) 3 किंवा 9 (B) फक्त 3 (C) फक्त 9 D. 3 किंवा 7

11.) 400 च्या वर्गात शून्यांची संख्या किती (साधारण)

(A) 2 (B) 3 (C) 4 (D) 6

12.) एखाद्या संख्येचा विषम स्थानातील अंक 1 किंवा 9 असेल तर त्यासंख्येचा वर्गाच्या विषम स्थानातील अंक (साधारण)

(A) 1 (B) 2 (C) 3 (D) 6

13.) दोन सलग पूर्णांक संख्यांचा गुणाकार म्हणून व्यक्त करता येणारी संख्या (कठीण)

(A) 20 (B) 25 (C) 50 (D) 100

14.) खालील पैकी पायथागोरसचे त्रिगुण कोणते (सुलभ)

(A) (1, 2, 3) (B) (2, 3, 4) (C) (3, 4, 5) (D) (4, 5, 6)

15.) (8,15,x) जर हे पायथागोरसचे त्रिकोण असेल तर x ची किंमत

(A) 16 (B) 17 (C) 18 (D) 23

16.) एक संख्येच्या वर्गमुळाचे चिन्ह आहे. (सुलभ)

A) $\sqrt[3]{}$ (B) $\sqrt{}$ (C) $\in$ (D) $\neq$

17.) वारंवार वजाबाकी पद्धतीने वर्गमूळ शोधण्यासाठी आपल्याला वजाबाकी करावी लागेल (सुलभ)

(A) सम संख्या (B) विषम संख्या (C) मूळ संख्या (D)नैसर्गिक संख्या

18.) वारंवार वजाबाकी पद्धतीने 25 चे वर्गमूळ शोधण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पायऱ्या (साधारण)

(A) 3 (B) 4 (C) 5 (D) 6

19.) 31 चा वर्ग (साधारण)

(A) 62 (B) 961 (C) 691 (D) 91

20.) $\sqrt{144}$ + $\sqrt{25}$ ची किंमत (साधारण)

(A) 17 (B) 19 (C) 169 (D) 12

21.) एकाचौरसशेतीचेक्षेत्रफळ 625 m^2असतानात्यांच्याएकाबाजूचीलांबी (साधारण)

(A) 5m (B) 15m (C) 25m (D) 35m

22.) एका शिडीची लांबी मीटर आहे 13 जर तिचा पायाभिंती पासून पाचमीटर अंतरावर असलेल्या किमती लाटेकलेले असेल तर शिर्डीचा वरचा भाग ज्या भिंतीला स्पर्शकरतो त्याची सरासरी उंची (कठीण)

(A) 8m (B) 12m (C) 13m (D) 18m

23. आयताकृती बागेचे क्षेत्रफळ 900m^2 आहे जर एखाद्या व्यक्तीने त्याच्या परिमिती भोवती दोन दाफिरले तर त्याने कापलेल्या एकूण अंतरकिती आहेत (कठीण)

(A) 120m (B) 240m (C) 900m (D) 1800m

II. खालीलप्रश्नांचीउत्तरेलिहाएकगुणाचेप्रश्न

24. सर्वात लहान पूर्णवर्ग संख्या कोणती? (सुलभ)

25. वर्गसंख्येची व्याख्या लिहा? (सुलभ)

26. 60 आणि 70 मधील पूर्ण वर्गसंख्या लिहा (सुलभ)

27. कोणत्याही वर्गसंख्येचा शेवटचा अंक कोणते लिहा (साधारण)

28. 2061 ही संख्या पूर्णवर्ग संख्या आहे का तपास आणि कारणे द्या (साधारण)

29. 100 नंतर येणारा पूर्ण वर्गक्रमांक कोणता (साधारण)

30 6 आणि 7 च्या वर्गामध्ये कितीने संख्या आहे (साधारण)

31. पहिल्या चार विषम संख्यांची बेरीज करा (साधारण)

32. 49 हे सलग 7 विषम संख्यांची बेरीज म्हणून सिद्ध करा (साधारण)

33. पायथागोरस त्रिकेतील एक संख्या दोनमीटर असेल तर इतर दोन संख्या लिहा (साधारण)

34. 7^2हे दोन क्रमवार संख्यांची बेरीज आहे सिद्ध करा (सुलभ)

35. जर $3^2 - 2^2 = 5$, $4^2 - 3^2 = 7$, असताना 5^2-4^2ची किमत काढा. (साधारण)

36. $(1 + 2)^2 = 9$, $(2 + 3)^2 = 25$ यांच्या निरीक्षण करा. आणि$(3 + 4)^2$ची किमत काढा (साधारण)

37. एका चौरसाचे क्षेत्रफळ $144 cm^2$वर असताना त्यांची बाजूची लांबी शोधा (साधारण)

38. ($\sqrt{9}$) ची किमत लिहा. (सुलभ)

39. $11^2 = 121$ असताना 121 चे वर्ग मूळ काढा. (सुलभ)

40. $x^2 = 36$ असताना xची किमत काढा. (सुलभ)

41. एखाद्या संख्येला त्या संख्येने गुणाकार केला जातो तेव्हा त्याचा परिणाम 144 असेल तर ती संख्या कोणती. (सुलभ)


42. 0.6 चा वर्ग किती? (सुलभ)

43. सर्वात लहान चार अंकी वर्गसंख्या लिहा. (साधारण)

III. खालीलप्रश्नांचीउत्तरेलिहा(2 गुणाचेप्रश्न)

44. ज्यातील लहानात लहान संख्या 8आहे अशी पायथागोरसची त्रीके लिहा (साधारण)

45. दिलेल्या आकृतीमध्ये x ची किंमत काढा (साधारण)



46. 12^2 चे मूळ घटक शोधा(अवयव पद्धतीने) (साधारण)

47. 196 चेअवयवपद्धतीनेवर्ग (साधारण)

48. 9408 ला कोणत्या लहान संख्येने भागल्यास त्या संख्येचा भागाकार पूर्णवर्ग बनतो आणि त्या भागाचे वर्गमूळ शोधा (साधारण)

49. 4, 9 आणि 10 ने भाग जाणारी सर्वात लहान वर्गसंख्या शोधा. (कठीण)


50. भागाकार पद्धतीने 2304 चे वर्गमूळ काढा (साधारण)

51. 180 ला पूर्णवर्ग करण्यासाठी सर्वात लहान कोणत्या संख्येने गुणले पाहिजे म्हणजे पूर्णवर्ग होईल (साधारण

52. 396 ला पूर्णवर्ग करण्यासाठी सर्वात लहान कोणत्या संख्येने भागली पाहिजे म्हणजे पूर्णवर्ग होईल (साधारण)

53. 12 ही एक संख्या असणारी पायथागोरसची त्रिके काढा. (साधारण)

54. दिलेल्या आकृतीमध्ये एक चौरसाकृती मैदानाची एक बाजू मीटर आहे तर त्या मैदानाचे कर्ण किती ते 25 काढा(साधारण)



55. एक काटकोन त्रिकोणात कर्णाची लांबी 5 cmआणि एका बाजूची लांबी 3 cm आहे तर दुसरी बाजूची लांबी काढा. (कठीण) 56. भागाकर पद्धतीने 729वर्ग मूळकाढा (साधारण)

57. भागाकार पद्धतीने2. 56 चे वर्ग मूळ काढा. (साधारण)

58. एका शाळेच्या आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी 2401 ची पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्य निधीसाठी देणगी दिली प्रत्येक विद्यार्थ्यांनी वर्गातील एकूण विद्यार्थ्यांचे संख्या इतके रुपये देणगी दिली तर वर्गातील विद्यार्थी संख्या किती? (कठीण)

59. एका बागेमध्ये 2025 झाडे लावली आहेत प्रत्येक ओळीमध्ये लावलेल्या झाडांची संख्या ही बागेची ओळीच्या संख्येत किती आहे तर बागेतील ओळींची संख्या आणि प्रत्येक ओळीतील झाडांची संख्या काढा (साधारण)

60. वारंवार वजाबाकी करून 121 वर्गमूळ काढा (साधारण)

61. 2352 ही पूर्णवर्ग संख्या आहे काय नसेल तर तिचा कोणता लहानात लहान गुणात पूर्ण वर्ग संख्या असेल नवीन संख्येचे वर्गमूळ काढा (साधारण)

62. 2028 या संख्येला कोणत्या लहानात लहान पूर्णवर संख्येने गुणल्यास ती पूर्णवर संख्या होईल आणि मिळालेल्या वर्गसंख्येचे वर्गमूळ काढा. (साधारण)

63. 2745 या संख्येला कोणत्या लहानात लहान पूर्णसंख्येने गुणल्यास भागल्यास ती पूर्णवर्ग संख्या होईल मिळालेल्या संख्येचे वर्गमूळ काढा (साधारण)

64. $\sqrt{3136}$वर्गमूळ हेभागाकारपद्धतीने सोडवा (साधारण)

65. 1989 मधून लहानात लहान कोणती संख्या वजाकेली असता तीपूर्ण वर संख्या बनते ते काढा.पूर्ण वर्ग संख्येचे वर्गमूळ काढा (साधारण)

66. 1825 मध्ये लहानत लहान कोणती संख्या मिळविल्या सपूर्ण वर्ग संख्या मिळते ती काढा. आणि मिळालेल्या पूर्णवर्ग संख्येचे वर्गमूळ काढा (साधारण)

67. एका चौकोनी खोलीचे क्षेत्रफळ 144m^2वर्ग आहे तर मीटर लांबीच्या चौकोनी फरशी जमिनीवर पूर्णपणे 0.5 लागतील ते करा घालायचे आहेत तर जमिनीवर किती फरश्या लावावे(कठीण)

68. एका यताकृती बागेची लांबी m 72 मीटर आणि रुंदी आहे 18आहे जर ती त्याच क्षेत्रफळाचे चौकोनी बागेत रुपांतरीत करायचे असेल तर नवीन बागेच्याकाठाचीलांबीकाढा(कठीण)

69. एकामाळीकडे 1000 रुपये आहेत त्याला ती रोपे अशी लावायची आहेत की उभ्यारांगा वाढव्या रांगा यामध्ये समान संख्येने रोपे होतील तरअसे करण्यास त्याला आणखी कमीतकमी किती जादारुपांची गरजअशीलागेल(कठीण)

70. एकाबागेत 2025 रुपयेलावायचेआहेतप्रत्येकओळीतीलरोपांची संख्या होळीच्या संख्ये इतकी आहे तर प्रत्येक ओळीतील रोपांची संख्या काढा आणि जर आणखी पाच ओळी जोडायचे असतील तर चौरसात लावण्यासाठी लागणाऱ्या रोपांची एकूण संख्या काढा(कठीण)

71. एका शाळेत एकदा विद्यार्थी 464 आहेतजेव्हा ते सर्व शारीरिक व्यायामासाठी रांगेत उभे असतात तेव्हा शिक्षकांच्या लक्षात येतेकी काही विद्यार्थी मागे राहिले आहेत मग प्रत्येक आडव्या रांगेत उभे असले ल्या विद्यार्थ्यांची संख्या काढा या व्यवस्थित किती विद्यार्थी शिल्लक आहेत चौकोन किती विद्यार्थी आहेत(कठीण)

घन आणि घनमूळ

शिकण्याचा परिणाम

दिलेल्या संख्येचे घन आणि घनमूळवी पद्धतीने शोधली जातील

सारांश

- संख्येचेघन
- काहीमनोरंजकनमुने
- क्रमवारविषमसंख्यांचीबेरीजकरणे
- घनआणित्यांचेमूळअवयव
- लहानातलहानगुणकजोपूर्णघनआहे
- घनमूळ
- मूळअव्यवीकरणपद्धतीनेघनमूळकाढणे

सुलभ	साधारण	कठीण	एकूण
10	29	07	46

I. खालील प्रश्नांना किंवा विधानांना चार पर्यायी उत्तरे दिली आहेत त्यापैकी योग्य उत्तर निवडा आणि पूर्ण उत्तर त्याच्या अक्षर असा लिहा

1. 7 चा घन किती (सुलभ)

(A) 14 (B) 21 (C) 49 (D) 343

2. 7 च्या घनाच्या सुटे स्थानातील अंक (सुलभ)

(A) 3 (B) 7 (C) 1 (D) 4

3. 1000 चा घनमूळ (सुलभ)

(A) 10 (B) 20 (C) 100 (D) 1000

4 0.3 चा घन (सुलभ)

(A) 0.27 (B) 27 (C) 0.027 (D) 0.0027

5. खालील पैकी पूर्णघन संख्या (सुलभ)

(A) 128 (B) 100 (C) 1000 (D) 225

6. खालीलपैकी पूर्णघन संख्या नसलेली (सुलभ)

(A) 216 (B) 1000 (C) 100 (D) 343

7. घनमूळाचे चिन्ह (सुलभ)

A) $\sqrt[3]{}$ B) $\sqrt{}$ C) $\in$ D) $\neq$

8. $(-3)^3$चीकिंमत (सुलभ)

9. एका पूर्णवर्ग संख्येच्या विषम ठिकाणी असलेला अंक 8 आहे परंतु त्याच्या वर्गमूळच्या सुटेच्या ठिकाणी असलेला अंक (सुलभ)

(A) 2 (B) 4 (C) 6 (D) 8

10. विषम संख्येचा घन नेहमीच (सुलभ)

A) विषमसंख्या B) समसंख्या C) मूळ संख्या D) ऋण संख्या

11. जर कोणत्याही घनसंख्येसाठी x ला$x^3 = x^2$असेल तर x ची किंमत (साधारण)

(A) 1 (B) 2 (C) 3 (D) 9

12. जर एखाद्या संख्येचा शेवट दोन शून्याने होत असेल तर त्याच्या घनातील शून्याची संख्या(साधारण)

(A) 2 (B) 4 (C) 6 (D) 9

13. पूर्णघन संख्या होण्यासाठी 24 ला लहानात लहान कोणत्या संख्येने गुणावे लागेल (साधारण)

(A) 2 (B) 3 (C) 9 (D) 18

14. जेव्हा एखाद्या संख्येचा घन आणि त्याच्या वर्गातील फरक 100 असतो तेव्हा ती संख्या (कठीण)

(A) 5 (B) 10 (C) 15 (D) 20

15. पहिल्या दोन नैसर्गिक संख्यांच्या घनांची बेरीज (साधारण)

(A) 2 (B) 9 (C) 17 (D) 36

16. $\sqrt[3]{8}$x .$\sqrt[3]{27}$ चे किंमत (साधारण)

(A) 6 (B) 12 (C) 35 (D) 216

17. x^3= 512 असताना x ची किंमत (साधारण)

(A) 4 (B) 6 (C) 8 (D) 12

18. सर्वात लहान मूळ संख्येचा वर्ग आणि घनाचा गुणाकार (साधारण)

(A) 1 (B) 4 (C) 8 (D) 32

19. संख्येच्या मूळ अवयवांचा गुणाकार2^3 x 3^3 x 5^3आहे परंतु त्या संख्येचे घनमूळ (साधारण)

(A) 6 (B) 11 (C) 30 (D) 9000

20. एक शिल्पकार 7 सेंटीमीटर लांबीचा एक घनब्लॉक बनवितो. (कठीण)

(A) 21 cm^3 (B) 49cm^3 (C) 343cm^3 (D) 2401cm^3

21. 0.000512 चे घनमूळ (साधारण)

(A) 8 (B) 0.08 (C) 0.008 (D) 8

22. एका घनाचे घनफळ आहे परंतु त्याच्या कडाची लांबी 125cm^3 (साधारण)

(A) 5 cm (B) 10 cm (C) 15 cm (D) 25 cm

II. खालीलप्रश्नांचीउत्तरेलिहा(एकगुणाचेप्रश्न)

23. एक पेक्षा मोठे असलेली सर्वात लहान पूर्णघन संख्या कोणती (सुलभ)

24. एक ते पाच पर्यंतच्या संख्यांचे घन लिहा (साधारण)

25 a x a x a = 64 असताना a चीकिंमतकाढा. (साधारण)

26. 2^3हे विषम संख्यांची बेरीज नुसार सोडवा (साधारण)

27. 15 15 चे मूळ अवयव काढा (साधारण)

28. 1,8,27,64,--- या श्रेणीतील पुढील संख्या कोणती (सुलभ)

29. $\sqrt[3]{64\,x 27}$ चे किंमत काढा. (साधारण)

30. 24 चे घनयातील सुटे स्थानातील संख्या कोणती (साधारण)

31. एका संख्येच्या मूळ अवयवांचा गुणाकार 2^2 x 3^3 x 5^1असे लिहिता येतो तर त्या संख्यांचा पूर्णघन संख्या होण्यासाठी लहानात लहान कोणत्या संख्येने गुणले पाहिजे (साधारण)

32. 8^3- 7^3चे किंमत काढा (साधारण)

III. खालीलप्रश्नांचीउत्तरेलिहा(2गुणाचेप्रश्न)

33. 512 घनमूळ मूळअविकरण पद्धतीने काढा (साधारण)

34. 4^3हे विषम संख्यांची बेरजेच्या घटनानुसार करा (साधारण)

35. 216 चे मूळ अवयव पद्धतीने सोडवा (साधारण)

36. 243 हे पूर्णघण संख्या आहे काय कारणे द्या (साधारण)

37. पूर्णघन संख्या होण्यासाठी 81 ला लहानात लहान कोणत्या संख्येने गुणले पाहिजे (साधारण)

38. 6 सेंटीमीटर लांबीच्या कडा असलेल्या घनाचे आकारमान काढा. (साधारण)

39. 392 हे पूर्णघन संख्या आहे काय जर नसेल तर कमीत कमी कोणत्या नैसर्गिक संख्येने गुणले तर घन संख्या मिळेल. (साधारण)

40. एका आयताकृती घनाचे परिमाण 5 सेंटीमीटर,, 2 सेंटीमीटर, 5 सेंटीमीटरआहेतअशा आयताकृती घनाचा वापर करून घन तयार करण्यासाठी किती आयताकृती घन आवश्यकआहेत. (कठीण)

41. 13824 संख्येचे घनमूळ अवयव पद्धतीने सोडवा. (साधारण)

IV.खालीलप्रश्नांचीउत्तरेलिहा(3गुणांचेप्रश्न)

42. 1 ते10 अंका पर्यंत घन संख्या लिहा (सुलभ)

43.53240 ही संख्या पूर्णघन संख्या आहे काय? जर नसेल तर लहानात लहान कोणत्या नैसर्गिक संख्येने भागले असता घनसंख्या मिळेल (कठीण)

44. 68,600 ही संख्या पूर्णघन संख्या आहे काय? जर नसेल तर लहानात लहान कोणत्यानै सर्गिक संख्येने गुणले असता पूर्णघन संख्या मिळेल. (कठीण)

45. एका कारखान्यात 8cm^3 क्षेत्रफळाचे लाकडी ठोकळे तयार होतात असे 64 ठोकळे एकत्र करून एक मोठा घन ठोकळा तयार केला जातो अशा प्रकारे तयार झालेल्या मोठ्या ठोकळ्याच्या काठाची लांबी काढा.(कठीण

V. खालील प्रश्न उत्तरे लिहा(4 गुणांचे प्रश्न)

46. 9 सेंटीमीटरआणि 10 सेंटिमीटरकडाअसलेलेदोनधातूचेघनवितळूनएकमोठाघनबनवलाजातोतोबनवताना 1 cm^3 धातूवायाजातोतरखालीलप्रश्नउत्तरेलिहा. (कठीण)

a) प्रत्येकघनाचेघनकडा b) मोठ्याघनाच्याकाठाचीलांबीकाढा

प्रकरण 7 वे : प्रमाणांची तुलना

अध्ययन निष्पत्ती

नफा आणि तोटा,सूट मुल्यवर्धित कर या संकल्पनांचा उपयोग करुन
त्या संदर्भातील समस्यांचे निराकण करणे

अध्यनातील मुद्दे:

*गुणोत्तर आणि शेकडेवारी यांची आठवण करणे.
* सूट काढणे.
*शेकडेवारीतील अंदाज
*विक्रीकर /मुल्यवर्धित कर / वस्तू व सेवा कर काढणे
*व्याज , सरळव्याज आणि चक्रवाढ व्याज काढणे.
*चक्रवाढव्याजाच्या सूत्राचा उपयोग करणे.

प्रश्नांचे प्रकार

सोपे प्रश्न	साधारण प्रश्न	कठीण प्रश्न	एकूण प्रश्न
10	30	09	49

1.खालील प्रश्नाना वअपूर्ण वाक्याना चार पर्याय दिलेलेआहेत.त्यातील योग्य पर्याय निवडून उत्तर क्रमांकासहित लिहा.

1.चक्रवाढ व्याज काढण्यासाठी या सूत्राचा उपयोग करतात. (सोपा)

A) $A = R(1+\frac{P}{100})^{n}$ B) $A = R(1-\frac{P}{100})^{n}$

C) $A = P(1+\frac{P}{100})^{R}$ D) $A = R(1+\frac{R}{100})^{n}$

2.$\frac{30}{25}$ या अपूर्णांचे गोणोतर रुप हे आहे. (सोपा)

A) 5:2 B) 6: 5 C) 4 : 6 D) 5 : 6

3.आंब्याचीसंख्या,सफरचंदाच्या संख्येच्या $\frac{1}{4}$ इतकी आहे हे गोणोतराच्या रुपात असे आहे. (सोपा)

A) 4 : 1 B) 1 : 4 C) 4 : 2 D) 2:4

4. 50 पैशाचे 1 रुपयाशी गुणोतर हे आहे. (सोपा)

A) 1 :2 B) 2 : 1 C) 1 : 1 D) 1 : 5

5.एका मुलीने एक टेबल रु.1000 ला खरेदी करुन तो रु.1200 ला विकला तर तिला झालेला नफा इतका आहे

A) रु.1000 B) रु.1200 C) रु.200 D) रु.800 (सोपा)

6. 25 Kg चे 200g.शी गुणोतर हे आहे. (साधारण)

A) 120: 123 B) 100: 110 C) 125 : 1 D) 115 : 123

7. एका पुस्तकाची छापील किमत रु.100 आहे.दुकानदाराने त्यावर 25% सूट दिल्यास त्या पुस्तकाची विक्रीची किमत ही आहे. (साधारण)

A) रु.100 B) रु. 25 C) रु. 125 D) रु. 75

8. एका अलिशान कारचा वेग 120 किलोमीटर दर तास आणि साध्या कारचा वेग 25 किलोमीटर दर तास आहे तर अलिशान कार व साध्या कारच्या वेगाचे गुणोत्तर हे आहे

A) 24:5. B) 25.4 C) 25.3 D) 23:5 (साधारण)

9. 20 जणांच्या कुटुंबात 8 पुरुष आहेत तर पुरुषांची शेकडेवारी इतकी आहे (साधारण)

A) 20% B) 40% C)52% D)68%

10. एका वर्गातील एकूण विद्यार्थ्यांपैकी 60 टक्के मुली आहेत आणि त्यांची एकूण संख्या ही 18 आहे तर मुलांची संख्या इतकी आहे (साधारण)

A) 12 B) 15 C) 16 D) 13

11. एका घड्याळाची छापील किंमत रुपये 100 आहे आणि त्यावर रुपये 240 सूट दिल्यास सूट ची शेकडेवारी ही आहे. (साधारण)

A) 25% B) 18% C) 20% D) 15%

12. एका संख्येची 20% वाढ होते आणि वाढ झालेल्या संख्येची 20% घट होत असेल तर झालेला बदल असा आहे (कठीण)

A) बदल नाही B) 8% कमी होतो C) 4% अधिक होतो D) 4% कमी होतो

13. एका टी व्ही ची छापील किंमत रुपये 40000आहे जर त्यावर 8% टक्के सूट दिल्यास टी.व्ही ची विक्रीची किमत इतकी होते.

A) रु. 32000 B) रु. 3200 C) रु. 36800 D) रु. 43200 (साधारण)

14.एका पुस्तकाची किंमत रु.1000 आहे आणि त्यावर 16% विक्रीकर लावला, तर पुस्तकाची विक्रीची किमत

A) रु.1060 (B) रु.1016 (C) रु.1160 (D) रु.1006 (साधारण)

15. एखाद्या वस्तूची किंमत रु.1000 आहे आणि त्यावर 12% मुल्यवर्धित कर(VAT) लावण्यात आला, तर एकूण विक्रीची किंमत इतकी होते.

A) रु.1120 B) रु.1200 C) रु.1100 D) रु.1012 (साधारण)

II.पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा: (1 गुणांचे प्रश्न)

16.सूट म्हणजे काय ? (सोपा)

17. G S T चा विस्तार लिहा. (सोपा)

18.भारत सरकारने GST कोणत्या वर्षी लागू केला? (सोपा)

19.VAT चे पूर्ण रुप लिहा. (सोपा)

20.चक्रवाढ व्याजातील रक्कम (amount) काढण्याचे सूत्र लिहा.? (सोपा)

21.रक्कम (Amount), मुद्दल (Principle) आणि चक्रवाढ व्याज (Compound Interest) यातील संबंध काय लिहा.? (सोपा)

22. 4 : 5 हे गुणोत्तर शेकडेवारीत रूपांतरितकरा. (साधारण)

23. $\frac{3}{4}$ या अपूर्णांकाचे शेकडेअवारीत रूपांतर करा. (साधारण)

24. एका पुस्तकाची मूळ किंमत रु.80 आहे. दुकानदार ते रु.72 ला विकतो, तर दुकानदाराने किती रुपये सूट दिली ? (साधारण)

25. एक व्यक्ती A जवळ □.200 आहेत. त्याने त्यातील 80% रक्कम खर्च केली.तर त्याच्याकडे किती रक्कम शिल्लक आहे? (साधारण)

26. एका पेनची मूळ किंमत रु..40 आहे आणि ते रु.32 ला विकले जाते. तर त्यावर किती टक्के सूट दिली गेली ? (साधारण)

III.पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा: (2 गुणांचे प्रश्न)

27. वनमहोत्सव कार्यक्रमाच्या निमिताने विद्यार्थ्यांना काही रोपटे देण्यातआली. 50% विद्यार्थ्यांना 'पोंगामची' रोपटे, 30% विद्यार्थ्यांना 'कडूलिंबाची' रोपटे, आणि 20% विद्यार्थ्यांना 'चिंचेची' रोपटे देण्यात आली. जर 24विद्यार्थ्यांना चिंचेची रोपटे मिळाली असतील,तर वर्गातील एकूण विद्यार्थ्यांची संख्या किती ? (साधारण)

28. एका व्यक्तीने रु.14560 ला एक टी व्ही खरेदी केला, ज्यामध्ये 12% मुल्यवर्धित कर(VAT) समाविष्टआहे. तर मुल्यवर्धित कर (VAT) लावण्यापूर्वीची मूळ किंमत किती होती? (साधारण)

29. K.G.F या शहराची लोकसंख्या 2021 साली 1,63,600 होती. ती दरवर्षी 5% दराने वाढत गेली तर 2 वर्षांनी शहराची लोकसंख्या किती होईल? (साधारण)

30. एका व्यापाऱ्याने रु.800 किंमतीच्या वस्तूवर रु.1000 किंमत छापली . त्यानंतर त्यावर 10% सवलत देऊन विक्री केली. त्याला किती नफा झाला? (साधारण)

31.एका व्यक्तीने रु.40,000 ला एक टी.व्ही खरेदी केला आणि त्यावर वस्तू व सेवाकर (GST) दर 28% होता.तर वस्तू व सेवा कराची (GST)ची रक्कम किती असेल? (साधारण)

32.एका प्रदर्शनासाठी तिकिटाची किंमत रु. 50 वरून रु.65 केली गेली.तर तिकिटाच्या किमतीत किती टक्केवाढ झाली? (साधारण)

33. जर रु.1000 एका वर्षासाठी वार्षिक 10% चक्रवाढ व्याज दराने घेतली, तर 1 वर्षानंतर किती रक्कम परत द्यावी लागेल? (साधारण)

IV. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा: (3 गुणांचे प्रश्न)

34 .रु.1500 या मुद्दलावर 2 वर्षांनंतर रु.315 चक्रवाढ व्याज मिळाले. तर व्याजाचा दर किती होता? (साधारण)

35. एका विक्रेत्याने एक वस्तू 25%सूट देऊन विकली.त्यावर त्याने 20% नफा मिळवला. जर वस्तूची खरेदी किंमत रु.480 असेल, तर छापील किंमत किती असेल? (साधारण)

36. एका मोबाईल फोनची खरेदी किंमत रु.32,000 आहे. मोबाईल फोनची किंमत दरवर्षी 10% ने घसरणारी आहे.तर 2 वर्षांनंतर मोबाईल फोनची विक्रीची किंमत किती असेल? (साधारण)

37. एका व्यक्तीने 20% सूट घेऊन रु.3200 ला एक मनगटी घड्याळ खरेदी केले. तर त्या घड्याळाची छापील किंमत काय होती? (साधारण)

38. एका ग्राहकाने रु.6000 छापील किमतीची एक वस्तू खरेदी केली त्यावर त्याने 15% सूट मिळविली.त्यावर 10% विक्रीकर लावला.तर त्या ग्राहकाने एकूण किती पैसे दिले? (साधारण)

39. चक्रवाढ व्याज काढण्यासाठी सूत्राचा उपयोग करता येईल अशा तीन परिस्थिती लिहा. (साधारण)

40. काही वस्तूवर अशा किंमती छापल्या जातात की त्यावर 25% नफा मिळेल. परंतु काही सूट दिल्यानंतर नफा 12.5% होतो. तर किती सवलत दिली गेली? (कठीण)

V. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (4 गुणांचेप्रश्न)

41. वार्षिक 4% दराने 3 वर्षात रु.16,872.96 इतकी रास जमा होते तर मुद्दल काढा. (साधारण)

42. एका ठराविक मुद्दलावर 3 वर्षांकरिता 5%व्याजाने सरळ व्याज आणि चक्रवाढ व्याज यातील फरक रु.228 होतो तर मुद्दल काढा. (कठीण)

43. जर एखाद्या वस्तूची विक्रीची किंमत रु.50 ने कमी केली तर 5% नफा 5% तोट्यात बदलतो. तरवस्तूची मूळ विक्रीची किंमत काढा.? (कठीण)

44. एका व्यक्तीने प्रत्येकी रु.25,920किमतीच्या दोन वस्तू विकल्या. एक वस्तू 8% नफ्यावर तर दुसरी वस्तू 4% तोट्यात विकली. एकूण व्यवहारात शेकडा नफा किंवाशेकडा तोटा झाला ते काढा(कठीण)

VI. पुढीलप्रश्नांचीउत्तरेलिहा: (5 गुणांचेप्रश्न)

45. खालील वस्तूंची 8% विक्री कराने खरेदी किंमत काढा. (कठीण)

(a) रु.180 किंमतीची टूथपेस्ट

(b) प्रत्येकी रु.250 किंमतीचे तीन टेनिस बॉल्स

(c) प्रत्येकी रु.300 किंमतीच्या दोन छत्र्या

46. एका व्यक्तीने ठराविक चक्रवाढ व्याज दराने रु.15,000 ची 3 वर्षांसाठी गुंतवणूक केली. एका वर्षानंतर एकूण रक्कम रु.16,350 झाली. तर

i) वार्षिक व्याज दर काढा. ?

ii) दुसऱ्या वर्षाच्या शेवटी रक्कम किती होईल?

iii) तिसऱ्या वर्षाच्या शेवटी रक्कम किती होईल? (साधारण)

47. एका शर्ट 4% नफ्यावरआणि 5% नफ्यावर विकले गेल्यास दोन्ही विक्रीच्या किंमतीतील फरक रु.6 आहे. तरशर्टची मूळ खरेदी किंमत आणि दोन्हींच्या विक्रीच्या किंमती काढा? (कठीण)

48.एका व्यापाऱ्याने 2 टेबल रु.3120 ला खरेदी केले. एक टेबल 15% तोट्याने आणि दुसरा 36% नफ्याने विकला. जर दोन्ही टेबलची विक्रीची किंमत सारखी असेल, तर दोन्ही टेबलची खरेदी किंमत किती ते काढा.? (कठीण)

49. प्रत्येकी रु.450 किमतीच्या तीन वस्तू विकत घेतल्या. त्यातील एक वस्तू 10% तोट्याने विकली. उर्वरित दोन वस्तू किती किमतीला विकाव्यात जेणे करून संपूर्ण व्यवहारात 20% नफा मिळेल तर संपूर्ण व्यवहारावर नफा किती होतो ते काढा? (कठीण)

प्रकरण ४ वे- बैजिक पदावल्या आणि नित्य समीकरणे

अध्ययन निष्पती :
बहुपदींच्या बेरीज आणि गुणाकारांच्या नियमांचा उपयोग करुन समस्यांचे निराकरण करणे

अध्यापनातील मुद्दे:

*बैजिक पदावल्यांची बेरीज व गुणाकार.

*बैजिक पदावल्यांचा गुणाकार परिचय.

*एकपदीने एकपदीला गुणणे.

i) दोन एकपदींचा गुणाकार करणे.

ii) तीन किंवा जास्त एकपदींचा गुणाकार करणे

*बहुपदीने एकपदीला गुणणे.

i)द्विपदीने एकपदीला गुणणे.

ii)त्रिपदीने एकपदीला गुणणे.

*बहुपदीने बहुपदीला गुणणे

i)द्विपदीने द्विपदीला गुणणे.

ii)त्रिपदीने द्विपदीला गुणणे.

प्रश्नांचे प्रकार

सोपे प्रश्न	साधारण प्रश्न	कठीण प्रश्न	एकूण प्रश्न
17	26	05	48

I.खालील प्रत्येक प्रश्नासाठी चार पर्याय दिलेले आहेत.योग्य पर्याय निवडून पूर्ण उतर व त्याचे पर्यायाक्षर लिहा.

1.ज्या पदावलीत एक अथवा त्यापेक्षा जास्त पदे असून त्यांचा सहगुणक शून्य असत नाही आणि पदावलींचा घातांक ऋण असत नाही अशा पदावलीना असे म्हणतात (सोपा)

(A) एकपदी (Monomial) (B) द्विपदी (Binomial)

(C) त्रिपदी (Trinomial) (D) बहुपदी (Polynomial)

2. चलपदे समान व घातांक समान असणा-या पदाना असे म्हणतात.

(A) सजातीय पदे (Like terms) (B) विजातीय पदे (Unlike terms)

(C) स्थिरपदे (Constant terms) (D) चलपदे (Variables) (सोपा)

3. बहुपदींची बेरीज करताना सर्वप्रथम हे करावे

(A) विजातीय पदे शोधून त्यांची बेरीज करावी. (B) फक्त स्थिरांक पदांची बेरीज करावी.

(C) एकपदींची बेरीजकरावी (D) सजातीय पदे शोधून बेरीज करा (सोपा)

4. एका एकपदीने दुस-या एकपदीला गुणल्यास मिळणारा गुणाकार

(A) त्रिपदी (B) द्विपदी (C) त्रिपदी (D) सांगता येणार नाही (सोपा)

5.सजातीय पदामध्ये संख्या सहगुणक

(A) समान असणे आवश्यक आहे (B) समान असणे आवश्यक नाही

(C) वेगळेच असावेत (D) शून्य असावेत (सोपा)

6. ($xy + x^2yz$) या पदावलीचा प्रकार (सोपा)

(A) एकपदी (B) द्विपदी (C) त्रिपदी (D) द्वितीयघातांकबहुपदी

7. '5a' व '$6a^2$ ' यांचा गुणाकार हा आहे.

(A) $30a^2$ (B) 30a (C) $30a^3$ (D) $11a^2$ (सोपा)

8. खालीलपैकी या पदांच्या गुणाकाराने $a^3b^3c^3$ हे पद मिळते. (साधारण)

(A) a^2, ab^3, ca (B) ab, bc, ca (C) ab^2, bc^2, ca^2 (D) ab, b^2c, ca^2

9. (m + n) व (m – n) यांचा गुणाकार हा आहे. (साधारण)

(A) $m^2 + n^2$ (B) $m^2 – n^2$ (C) $m^2 + n^2 + 2mn$ (D) $m^2 + n^2 – 2mn$

10. दोन क्रमागत संख्यांचा गुणाकार $k^2 + k$ आहे.तर त्या दोन संख्या या आहेत. (साधारण)

